# प्रेसनोट

जा.क्र.पोउप-आ/वाहतूक/9666 /२०१८ पुणे शहर, दिनांक - १९.०९.२०१८

**विषय :- मोहरम - २०१८ मिरवणूक मार्ग वाहतूक व्यवस्थे बाबत.**

-----------

पुणे शहर व उपनगरात दिनांक- २१.०९.२०१८ रोजी, मोहरम सणानिमीत्त विविध मार्गावर वेगवेगळया वेळात ताबूत, पंजे, छबिले यांचे विसर्जन करणेकरीता मिरवणूका निघणार आहेत. सदर मिरवणूकी दरम्यान वाहतुकीची कोंडी होऊ नये,वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, तेजस्वी सातपुते, पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन खालीलप्रमाणे वाहतुक बंद/वळविणे बाबतचे आदेश निर्गमित करीत आहे.

## १. मुख्य मिरवणूक मार्ग, दुपारी १४.०० वा.

**मिरवणुक मार्ग** :- पर्वती गाव बँक ऑफ महाराष्ट्र पटेल हाऊस येथुन सुरूवात निलायम ब्रिज यु टर्न करुन पर्वती पुल डावीकडे वळुन सावरकर चौक डावीकडे वळुन जमनालाल बजाज चौक, उजवीकडे वळुन नेहरू स्टेडीयम मार्गे जेधे चौक, डाविकडे वळुन उलटे शिवाजी रोडने राष्ट्रभुषण चौक ते फडगेट चौकी, उजवीकडे वळुन बारा ईमाम दर्गा, पानघंटी चौक, मिठगंज पोलीस चौकी, जुनी रामेशी गेट पोलीस चौकी, डावीकडे संत कबीर चौक, पावर हाऊस चौकातुन नरतगिरी चौक, मालधक्का चौक, डावीकडे वळून शाहीर अमर शेख चौक, डावीकडे वळून कुंभार वेस चौक, यु टर्न करून पुन्हा शाहीर अमर शेख चौक आरटीओ चौक संगम ब्रिज येथे विसर्जन.

## २. लष्कर मिरवणूक मार्ग, दुपारी १२.०० वा.

**मिरवणुक मार्ग** :- मोहरमच्या शेवटच्या दिवशी दि. २१/०९/२०१८ रोजी लष्कर भागातील ताबूत पंजे ६९४, ताबूत स्ट्रीट येथे एकत्र जमून तेथून १२.०० वा. चे सुमारास मिरवणुक निघून बाटलीवाला बगीचा - सरबतवाला चौक - बाबाजान दर्गा - भोपळे चौक - गाव कसाब मशिद - डावीकडे वळून एम. जी. रोडने कोहीनूर चौक, भगवान महावीर चौक, नाझ हॉटेल चौक, डावीकडे वळून बुटी स्ट्रीटने बाटलीवाला बगीचा चौक या ठिकाणी १४.०० वा. चे सुमारास येऊन धार्मीक विधीचा कार्यक्रमासाठी थांबतात. नंतर तेथून पुढे नेहरू मेमोरियल हॉल - रहिम पेट्रोल पंप - जूना समर्थ पो.स्टे. मार्गे डावीकडे वळुन पावर हाऊस चौकतुन उजवीकडे वळून नरतगिरी चौक मालधक्का चौक डावीकडे वळुन शाहीर अमर शेख चौक डावीकडे वळुन कुंभार वेस चौक यु टर्न करून पुन्हा शाहीर अमर शेख चौक आरटीओ चौक संगम ब्रिज येथे विसर्जन.

### ३. खडकी भागातून निघणारी मिरवणूक मार्ग, दुपारी १६.०० वा.

**मिरवणुक मार्ग** :- आसुडखाना चौक, नवीन तालिम चौक, स्टार हॉटेल चौक, महाराष्ट्र बँक चौक, डी आर गांधी चौक, टिकाराम चौक, सराफ बाजार मार्गे, खडकी रेल्वे स्टेशन, मुंबई पुणे रोडने बोपोडी, वि.भा.पाटील पुलावरुन नदीत विसर्जन.

### ४. इमामवाडा येथून निघणारी मिरवणूक मार्ग, सकाळी १०.३० वा.

**मिरवणुक मार्ग** :- इमामवाडा लष्कर ते रहिम पेट्रोलपंप, नेहरु मेमोरीयल चौक, डावीकडे वळून पोलीस आयुक्त कार्यालय समोरुन जनरल पोस्ट ऑफिस चौक, साधु वासवानी चौक, १३ कॅनॉट रोड, आगाखान कंपांऊंड या ठिकाणी धार्मिक कार्यक्रम होऊन सदर मिरवणुक परत उलट मार्गे इमामवाडा येथे विसर्जित होत असते.

वरील नमूद मिरवणूक मार्गावरील वाहतूक आवश्यकतेनुसार अल्पकालावधी करीता बंद अथवा वळविण्यात येणार आहे तसेच मिरवणूक पुढे सरकताच पाठीमागील वाहतूक पुर्ववत करण्यात येईल. तरी वाहन चालकांनी वरील नमूद मार्गावर येण्याचे टाळावे तसेच पर्यायी मार्गांचा वापर करून वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे.